नियमीत दिवाणी दावा क्र. ४०/२०२२
निशाणी क्र. ३३

MHAH230000812022

**रेखा रमाकांत कुलकर्णी**
**वि.**
**लक्ष्मीकांत विश्वनाथ चांदेकर**

## नियमीत दिवाणी दावा क्र. ४०/२०२२ मधील निशाणी क्र. ३३ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. २ दिलीप विश्वनाथ चांदेकर यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन की, दिलीप विश्वनाथ चांदेकर हे दि. ११.०७.२०२२ रोजी दावा प्रलंबित असताना मयत झालेले आहे. सदर दिलीप विश्वनाथ चांदेकर यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. १० व ११ हे पुर्वीच दाव्यात समाविष्ट आहेत. परंतु त्यांच्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यास वादी यांना विलंब झालेला आहे. त्यामुळे दावा प्रतिवादी क्र. २ यांच्याविरुध्द अबेट झालेला आहे. प्रतिवादी क्र. २ मयत असल्याबाबतची कागदपत्रे व माहिती वादीला वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे वारस अर्ज मुदतीत दाखल करता आला नाही. सदरचा विलंब हा मुद्दामुन केलेला नाही. सदरचा विलंब माफ केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही असे नमुद करणे प्रतिवादी क्र. २ दिलीप विश्वनाथ चांदेकर यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करुन मिळावा अशी विनंती.

३. सदर अर्जास इतर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व नमुद केले आहे की, सदर अर्ज खरा व बरोबर नसुन तो प्रतिवादी यांना मान्य व कबुल नसुन त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ मयत दिलीप विश्वनाथ चांदेकर यांचे दावा मिळकतीमध्ये हितसंबंध आहेत. हे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर

होण्यासाठी व दाव्याची अनेकत्वे टाळण्यासाठी वादीचा अर्ज मंजुर करणे उचीत होईल. वादी यांनी निशाणी ३२ अन्वये दिलीप विश्वनाथ चांदेकर यांचे मृत्युचा दाखला सादर केलेला आहे. सबब खालील आदेश .

## आदेश

१. वादी यांचा निशाणी ३३ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.01.28 17:03:53 +0500

**दिनांक** – २७.०१.२०२६ रविंद्र भ. खवले,

**ठिकाण** – श्रीगोंदा **२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**श्रीगोंदा**